MHSN090003502025

**नियमित दिवाणी दावा क्र.५३/२०२५ मधील नि.क्र.२८ खालील आदेश**
**(रुपाली जाधव विरुध्द शिवाजी पाटील वगैरे)**

**(०१).** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**(०२).** अर्ज व त्यावरील वादीने दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**(०३).** प्रतिवादीचे कथन असे आहे की, ते सोने चांदीच्या व्यवसायानिमित्ताने कोईमत्तूर येथे गेलेले असल्याने तसेच त्यांना कैफियत देण्यासाठी आवश्यक असलेली जुनी कागदपत्रे व माहिती वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही. सबब त्यांनी झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती केली आहे.

**(०४).** वादीने सदर अर्जांवर लेखी म्हणणे दाखल करुन, असे कथन केले आहे की, अर्जात नमुद केलेले कारण खोटे आहे. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**(०५).** अभिलेख पाहिले. उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेली परस्पर विरोधी कथने विचारात घेवून अभिलेखाचे अवलोकनार्थ असे दिसते की, प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर ताकिदीकरीता व पोटहिस्से हद्दी कायम होवुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीं क्र. ३ यांना प्रस्तुत दाव्यामध्ये

कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. परंतू, मुळ दाव्याचे स्वरुप पाहता, सदर दाव्यामध्ये गुणदोषावर न्यायनिर्णय पारीत होणेकरीता प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक ठरते. कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ केल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसते. याऊलट प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर आल्यास दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. सबब कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब योग्य तो खर्चाचा आदेश पारीत करुन माफ करणे न्यायोचित होईल. यास्तव नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे झालेला विलंब माफ करुन प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्याकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**01.** प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**02.** प्रतिवादी क्र. ३ यास कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर रक्कम रुपये ३००/-(रुपये तीनशे मात्र) च्या खर्चासह माफ करण्यात येत आहे.

**03.** प्रतिवादी क्र. ३ ने खर्चाची रक्कम आज अगर पूढील तारखेपर्यंत वादीला दयावयाची आहे. खर्चाचीरक्कम दिल्यानंतरच प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.11 17:34:21 +0530

**तासगांव**
दिनांक: ११.०३.२०२६.

(एस.वाय.वाकचौरे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | ११.०३. २०२६. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | ११.०३. २०२६. |
| आदेश अपलोड दिनांक | – | ११.०३. २०२६. |